Pune,Mumbai,Satara,Solapur,Nashik,Marathawada Common

सकाळ
www.agrowon.com
# अॅग्रोवन
मित्र ग्लोबल शिवाराचा..

पुणे   शुक्रवार, २३ फेब्रुवारी २०१८ । पाने १६ । किंमत ₹ ३ । www.epaper.agrowon.com पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध

## मध्य महाराष्ट्रात आजपासून गारपिटीचा अंदाज



**पुणे (प्रतिनिधी) :** लक्षद्वीप परिसर ते मध्य महाराष्ट्राचा उत्तर भाग या दरम्यान कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. हे क्षेत्र कर्नाटक आणि कोकणचा दक्षिण भागातही दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजपासून (ता. २३) मध्य महाराष्ट्राच्या नगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव जिल्ह्याच्या काही भागांत गारपीट होण्याचा अंदाज हवामान विभागाच्या सूत्रांनी वर्तविला.

कोकणात समुद्रसपाटीपासून नऊशे मीटर उंचीवर चक्राकार वाऱ्याची स्थिती तयार झाली आहे. बंगालचा उपसागर आणि दक्षिण तमिळनाडू, श्रीलंका भागातही चक्राकार वाऱ्याची स्थिती तयार झाली आहे. लक्षद्वीप परिसर ते अरबी समुद्र दक्षिण महाराष्ट्रातही कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. हे क्षेत्र लक्षद्वीपकडून गुजरातच्या दिशेने सरकत आहे. बांगलादेशाच्या परिसरातही चक्राकार वाऱ्याची स्थिती तयार झाली आहे.

उद्या (ता. २४) मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पान ४ वर ▸

# शेतकरी कुटुंबीयांना चार लाखांची भरपाई द्या

▸ नागपूर खंडपीठाचे सरकारला आदेश | ▸ यवतमाळ कीटकनाशक मृत्युमुखी प्रकरण

नागपूर (प्रतिनिधी) : फवारणीमुळे विषबाधा होत दगावलेल्या शेतकरी कुटुंबीयांना चार लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गुरुवारी (ता. २२) दिले. राज्य सरकारने विषबाधेला कारणीभूत असल्याच्या कारणावरून पाच कंपन्यांवर ६० दिवसांची बंदी घातली. त्यांची या प्रकरणातील भूमिका तपासत दोषी सिद्ध झाल्यास त्यांच्याकडूनदेखील या रकमेची वसुली करावी, असेही आदेशात म्हटले आहे.

यवतमाळ येथील जम्मू आनंद यांनी मुंबईत रेल्वे पूल दुर्घटनेतील मृतांना भरपाईसाठी एक न्याय आणि यवतमाळसह राज्यात मरणाऱ्या शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदतीसाठी दुसराच न्याय लावला जात असल्याचा आरोप केला होता.

पान ४ वर ▸

> राज्य सरकारने यापूर्वी अवघी दोन लाख रुपयांची मदत विषबाधितांसाठी जाहीर केली होती. न्यायालयाने आता चार लाख रुपये भरपाईचे आदेश दिले आहेत. चौकशीअंती दोषी आढळल्यास कीटकनाशक कंपन्यांकडूनदेखील भरपाई रकमेची वसुली व्हावी, असेही न्यायालयाने म्हटले आहे.
> – **अरविंद वाघमारे,** याचिकाकर्त्यांचे वकील

# पाणंद रस्त्यांना निधी मिळणार

राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी) :** गावशिवारातील बारमाही शेतरस्त्यांच्या (पाणंद) कामांना गती देण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यास गुरुवारी (ता. २२) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे अतिक्रमित रस्ते मोकळे होण्यासह कच्चे व पक्के पाणंद रस्तेनिर्मितीच्या कामांचा वेग वाढणार आहे.

या योजनेअंतर्गत माती, दगड व मुरूम टाकून कच्चे शेतरस्ते किंवा पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करणे, तसेच पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करून कच्चा रस्ता तयार करणे आणि पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करून कच्चा व पक्का रस्ता एकत्रितपणे बांधणे या तीन बाबींचा समावेश आहे. यासाठी चौदावा वित्त आयोग, मनरेगा, खासदार, आमदार स्थानिक विकास निधी, वैधानिक विकास महामंडळांतर्गतचा निधी, गौणखनिज विकास निधी यांतून मिळणाऱ्या निधीबरोबरच ग्रामपंचायतीला जनसुविधांसाठी मिळणारे अनुदान, महसुली अनुदान, पेसाअंतर्गत निधी व स्व-निधी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सेस आणि इतर जिल्हा योजनांमधून मिळणारा निधी अशा विविध योजनांमधून मिळणारा निधी खर्च करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या रस्त्यांसाठी गौणखनिज स्वामित्व, मोजणी आणि पोलिस बंदोबस्त यासाठीच्या शुल्क आकारणीत विशेष बाब म्हणून सूट देण्यात येणार आहे. पूर्वी केवळ रोजगार हमी योजनेमधून करण्यात येणाऱ्या कामांसाठी निधीची उपलब्धता होणार असल्यामुळे पाणंद रस्त्यांच्या निर्मितीसाठी यंत्रसामग्रीचाही वापर करता येणार आहे.

पान ४ वर ▸

Sakāl Media Group
Print | TV | Digital | Events

agrowon Events & Exhibitions

## ज्ञानातून विकासाकडे आणि आधुनिकतेतून समृद्धीकडे नेणारे दर्जेदार कृषी प्रदर्शन

आजपासून शुभारंभ

सकाळ अॅग्रोवन
कृषी प्रदर्शन २०१८

**अहमदनगर**

**२३ ते २५ फेब्रुवारी २०१८**

**स्थळ : सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान, संत निरंकारी भवनासमोर, प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, अहमदनगर - ४१४ ००५**
**वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ७**

प्रदर्शनाला अवश्य भेट द्या

**कृषी प्रदर्शन चर्चासत्र वेळापत्रक**

| वार व तारीख | वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| शनिवार (ता. २४) | दु.१२ ते २<br>दु. ३ ते ५ | श्री. अंकुश पडवळे<br>डॉ. ज्ञानदेव हापसे | निर्यातक्षम डाळिंब उत्पादन<br>उसाचे एकरी १५० टन किफायतशीर उत्पादन तंत्र |
| रविवार (ता. २५) | दु. १२ ते २ | श्री. सी. व्ही. कुलकर्णी | मुक्त संचार गोठा आणि मुरघास निर्मिती व दुधाळ जनावर प्रजाती |

सहप्रायोजक
Chitale Genus ABS (India) Private Limited

**प्रदर्शनात पाहायला मिळेल –** • ट्रॅक्टर्स • हार्वेस्टिंग यंत्रे • विविध प्रकारची अवजारे व कापणी यंत्र उत्पादक कंपन्या • जैविक कीटकनाशके, विद्राव्य खते • ग्रीन हाउस टेक्नॉलॉजी आणि इम्प्लिमेंट्स् • बियाणे उत्पादक, टिश्युकल्चर • ठिबक व तुषार सिंचन • पॅकेजिंग इंडस्ट्रीज • ग्रेडिंग, वेइंग, सोर्टिंग अवजारे उत्पादक कंपन्या • कृषी शिक्षण संस्था • कृषी साहित्य प्रकाशन • कृषी संशोधन संस्था व शासनाचे विविध विभाग



एक झकास कृषी प्रदर्शन

| शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना | आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार | कृषी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग | परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे, प्रगतशील शेतकऱ्यांचे दररोज मार्गदर्शन |
|---|---|---|---|

**Website** - www.corporate.agrowon.com II www.agrowon.com II www.facebook.com/agrowon